**फौ.कि.अ. क्र. ५/२०२२**
सारिका व इतर वि. आनंदा व इतर
**नि.क्र.४१ लगत**

**जाबदारतर्फे साक्षीदार क्र.३ चा शपथेवर जबाबः–**

**नाव :– सखाराम दिनकर कोळेकर.**

७. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

**(एस.ए.विराणी)**
दि. ०६.१२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

**उलटतपास अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

८. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मी राहण्यास कायमस्वरुपती गाव निंबोत ता. बारामती येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदारची सख्खी थोरली बहिण माझी पत्नी आहे. मी अर्जदाराला २०११ पासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार आणि जाबदारचे लग्न निंबोडी येथे त्यांच्या मामाच्या गावी झाले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाचा पूर्ण खर्च अर्जदार आणि तिच्या मामाने केला आहे. मी नोव्हेंबर २०२१ मध्ये वाटलूज येथे अर्जदाराला घ्यायला गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचे वाटलूज येथील घर हे साधे स्वरुपाचे असून त्यात एकच खोली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराच्या वाटलूज येथील घरात तिचे आईवडील, आजी आणि लहान मुलगी असे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, मी वाटलूज येथे जाताना माझ्यासोबत माझी पत्नीदेखील होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वाटलूज येथे जाऊन अर्जदाराला आम्हांला मोकळे कर, सोडचिठ्ठी दे असे सांगायला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, वाटलूज येथून पाणी न पिताच आम्ही बाहेर पडलो. साक्षीदार म्हणतो, चहापाणी पिऊन निघालो होतो.

९. हे म्हणणे खरे आहे की, लग्न ठरले त्यावेळी जाबदार हा मुंबई येथे नोकरी करत होता. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार हा मुंबई आणि निंबोडी गावी जाऊन येऊन

असतो. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार माझा मेहुणा असल्यामुळे त्याला पोटगी बसू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.                                        समक्ष

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– ०६.१२.२०२५                    न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.